"गोषवारासह"

वाचा :- 1. महाराष्ट्र मालमत्ता विरुपीत करण्यास प्रतिबंध करणे अधिनियम 1995
2. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश दिनांक 14 ऑक्टोबर 2016
3. मा. राज्य निवडणूक आयुक्त, यांचे कडील निवडणूक कार्यक्रम ई-मेल पत्र क्र.रानिआ/मनपा/2017/प्र.क्र.47/का.5 दि.06 सप्टेंबर 2017.

"निवडणूक प्राधान्य"
"अत्यंत तातडीचे"
"आदेश"

जा.क्र.नांवाशमनपा/निवडणुक/ 141 2017
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
दिनांक :- 6/9/17

ज्या अर्थी राज्य निवडणूक आयोगाने संदर्भिय आदेशान्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2017 चा कार्यक्रम घोषित केलेला आहे. पत्राची प्रत सोबत देण्यात येत आहे.

त्या अर्थी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2017 च्या अनुषंगाने महानगरपालिका हद्दीमध्ये **दिनांक 06 सप्टेंबर 2017** पासून आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. आदर्श आचारसंहिते संदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक 14 ऑक्टोबर 2016 अन्वये आदेश निर्गमित केलेले आहे. सदरिल आदेशातील सुचनेनूसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

याद्वारे आपणास अवगत करण्यात येत आहे की, महानगरपालिका हद्दीत आपल्या क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत येत असलेली सर्व शासकिय/ निमशासकिय कार्यालयाच्या स्थावर मालमत्तेवर आवार भिंतीवर तसेच विद्युत खांबावर व दुरध्वनी खांबावर आदर्श आचारसंहितेच्या काळात कोणत्याही राजकिय पक्षाचे बॅनर्स, पोस्टर्स, फलक, घोषवाक्य, झेंडे, कटआऊटस इत्यादी असल्यास ते तात्काळ मिटविण्याचे / काढून टाकण्याची कार्यवाही करावी व आदर्श आचारसंहितेच्या काळात कार्यालयाचे इमारतीवर, आवारभिंतीवर, विद्युत खांबावर व दुरध्वनी खांबावर उपरोक्त प्रमाणे कोणत्याही राजकिय पक्षाचे बॅनर्स, पोस्टर्स, फलक, घोषवाक्य, झेंडे, कटआऊटस लावले/ लिहीले जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी. सदरिल निवडणूकीचे काळात उपरोक्त प्रमाणे मालमत्ता विरुपित केल्याचे निदर्शनास आल्यास संबधीत व्यक्ती विरुध्द महाराष्ट्र मालमत्ता विरुपन प्रतिबंध करणे अधिनियम 1995 मधील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

**निवडणूक अधिकारी तथा आयुक्त,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

**प्रति,**
क्षेत्रिय अधिकारी, क्षेत्रिय कार्यालय क्रं. अ,ब,क,ड, नावाशमनपा, नांदेड यांना तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

C:\Documents and Settings\elect-dept\Desktop\Acharsanhita २०१७.doc